महाराष्ट्र शासन

क्र.- बैठक-२०२४/ प्र.क्र.०३/बांधकामे
सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक : ७.२.२०२४

बैठकीचे इतिवृत्त

प्रति,

१) अ.मु.स., नियोजन विभाग,मंत्रालय,मुंबई
२) अ.मु.स., अल्पसंख्याक विभाग,मंत्रालय,मुंबई
३) प्रधान सचिव,उच्च व तंत्र शिक्षण विभाग,मंत्रालय,मुंबई
४) सचिव, आदिवासी विकास विभाग,मंत्रालय,मुंबई
५) सचिव,इतर मागास बहुजन कल्याण विभाग,मंत्रालय,मुंबई

विषय :- बार्टी, सारथी, महाज्योती, टीआरटीआय या संस्थांच्या विविध योजना/ धोरणांबाबत सर्वंकष धोरण निश्चित करणेबाबत...

महोदय,

बार्टी, सारथी, महाज्योती, टीआरटीआय, अमृत व तत्सम संस्थांच्या विविध योजना, धोरणांबाबत सर्वंकष धोरण सामाजिक न्याय विभागाच्या दि.३०.१०.२०२३ रोजीच्या शासन निर्णयान्वये निश्चित करण्यात आले आहे. सदर शासन निर्णयान्वये अ.मु.स. (वित्त) यांचे अध्यक्षतेखाली समिती गठीत करण्यात आलेली आहे.

सदर समितीची बैठक दि.३१.०१.२०२४ रोजी सायंकाळी ५.०० वाजता अ.मु.स.(वित्त) यांचे अध्यक्षतेखाली मा.मुख्य सचिव, यांचे समिती कक्ष, मुख्य इमारत, मंत्रालय, मुंबई येथे आयोजित करण्यात आली होती. सदरील बैठकीचे इतिवृत्त आवश्यक कार्यवाहीस्तव आपणाकडे सादर करण्यात येत आहे.

आपला,

(अ.कों.आहिरे)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत, माहितीस्तव

१. मा.मुख्य सचिव, यांचे स्वीय सहाय्यक,मंत्रालय,मुंबई
२. अपर मुख्य सचिव, वित्त विभाग, यांचे स्वीय सहाय्यक मंत्रालय, मुंबई
३. सचिव (सा.न्या. व वि.स.) यांचे स्वीय सहायक, मंत्रालय,मुंबई
४. सह सचिव (बांधकामे) सा.न्या. व वि.स. यांचे स्वीय सहायक, मंत्रालय,मुंबई
५. निवडनस्ती

**सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग/बांधकामे**

बार्टी, सारथी, महाज्योती, टीआरटीआय, अमृत व तत्सम या संस्थांच्या योजनांमध्ये विविध योजनांबाबत सर्वंकष धोरण निश्चित करणे याबाबत अ.मु.स.(वित्त) यांचे अध्यक्षतेखाली बुधवार, दि.३१.०१.२०२४ रोजी, मा.मुख्य सचिवांचे समिती कक्ष, मंत्रालय, मुंबई येथे बैठक आयोजित करण्यात आली होती.

सदर बैठकीस खालील अधिकारी उपस्थित होते.

| अ.क्र. | अधिकाऱ्याचे नाव | पदनाम |
|---|---|---|
| १ | श्री.विकास रस्तोगी | प्रधान सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग |
| २ | श्रीम.आय.ए. कुन्दन | प्रधान सचिव, अल्पसंख्यांक विभाग |
| ३ | श्रीम.अंशु सिन्हा | सचिव, इतर मागास बहुजन कल्याण विभाग |
| ४ | श्री.सुमंत भांगे | सचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग |
| ५ | डॉ.रामास्वामी एन. | सचिव, नियोजन विभाग |
| ६ | श्री.विजय वाघमारे | सचिव, आदिवासी विकास विभाग |
| ७ | श्री.दिनेश डिंगळे | सह सचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग |
| ८ | श्री.म.र.शेळके | उप सचिव, आदिवासी विकास विभाग |
| ९ | श्री.दिनेश चव्हाण | उप सचिव, इतर मागास बहुजन कल्याण विभाग |
| १० | श्री.आनंद भोंडवे | उप सचिव, अल्पसंख्यांक विभाग |

सदर बैठकीत खालीलप्रमाण निर्णय घेण्यात आले-

<table>
<tr><th>अ.क्र.</th><th>घेतलेला निर्णय</th><th>अंमलबजावणी यंत्रणा</th></tr>
<tr><td>१</td><td>राज्यातील विविध शासकीय संस्थांकडून राबविण्यात येणाऱ्या महाराष्ट्र लोकसेवा आयोग व इतर सगळ्या स्पर्धा परीक्षा पुर्व प्रशिक्षण कार्यक्रमांची अंमलबजावणी व सनियंत्रण करण्यासाठी खालीलप्रमाणे समिती गठीत करण्यात यावी.
<table>
<tr><td>आयुक्त, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था,पुणे</td><td>अध्यक्ष</td></tr>
<tr><td>महासंचालक, डॉ.बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था, (बार्टी) पुणे.</td><td>सदस्य</td></tr>
<tr><td>व्यवस्थापकीय संचालक,छत्रपती शाहू महाराज संशोधन व प्रशिक्षण संस्था (सारथी) पुणे.</td><td>सदस्य</td></tr>
<tr><td>व्यवस्थापकीय संचालक, महात्मा ज्योतीबा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्था (महाज्योती), नागपूर</td><td>सदस्य</td></tr>
<tr><td>व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र संशोधन व प्रशिक्षण प्रबोधिनी (अमृत), मुंबई.</td><td>सदस्य</td></tr>
<tr><td>व्यवस्थापकीय संचालक, मौलाना आझाद आर्थिक विकास महामंडळ,मुंबई</td><td>सदस्य</td></tr>
<tr><td>सह संचालक, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे</td><td>सदस्य सचिव</td></tr>
</table></td><td>आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था,पुणे</td></tr>
</table>

| | | |
|---|---|---|
| | सदर अंमलबजावणी प्रक्रिया पारदर्शक तसेच सुटसुटीत करण्यासाठी मानक नियमावली (Standard Operating Procedure) तयार करणे तसेच अंमलबजावणी करतांना वेळोवेळी उद्भवणाऱ्या व्यावहारिक समस्या (practical problems) सोडवण्यासाठी त्या नियमावलीत बदल करण्याचे अधिकार सदर समितीस राहतील.<br>तसेच परीक्षेदरम्यान पर्यवेक्षणासाठी मनुष्यबळ उपलब्धता आणि इतर अनुषंगिक बाबी, इत्यादीची संबंधित संस्थांची जबाबदारी याची निश्चिती या समितीने मानक प्रक्रियेत करावी.<br>सदरील प्रक्रियेत उद्भवणाऱ्या खर्चाची प्रतिपूर्ती संबंधित संस्थेने आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्थेस करावी. | |
| २ | वरील नमुद सर्व संस्थांकडून राबविण्यात येणाऱ्या स्पर्धा परिक्षांसाठी प्रशिक्षण कार्यक्रमांतर्गत प्रशिक्षण संस्थांचा पायाभूत सुविधा (Infrastructure), उपलब्ध प्रशिक्षक (Faculty), त्या क्षेत्रातील त्यांच्या विविध उपलब्धी, इत्यादींच्या आधारे वरील अ.क्र. १ येथे नमूद समितीमार्फत "Expression of Interest" व्दारे प्रस्ताव मागविण्यात यावेत.<br>समितीने निश्चित केलेल्या निकषांच्या पूर्तता करणाऱ्या सगळ्या संस्थांना नाम-निर्देशित (Empanel) करावे. या क्षेत्रातील प्रथितयश संस्था यांचा या यादीमध्ये सहभाग असण्याबाबत आवर्जून प्रयत्न करावा. सदर नाम-निर्देशित (empanelled) संस्थांची यादी वेळोवेळी अद्ययावत करायची मुभा सदरील समितीस असेल. | उपरोक्त अ.क्र.१ येथे नमूद समिती |
| ३ | बार्टी, सारथी, महाज्योती, टीआरटीआय, अमृत व अल्पसंख्यांक विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या महाराष्ट्र लोकसेवा आयोग व इतर विविध स्पर्धा परीक्षा पुर्व प्रशिक्षण कार्यक्रमाकरिता विद्यार्थी निवडीसाठी घेण्यात येणारी चाळणी परीक्षा ही सर्व विभाग/संस्थांसाठी आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था या एकाच संस्थमार्फत राबविण्यात यावी.<br>प्राविण्य मिळविलेल्या विद्यार्थ्यांची यादी तसेच त्याने दिलेला पसंतीक्रम संबंधित संस्थेस पुढील कार्यवाहीसाठी समितीमार्फत कळवले जाईल. संबंधित विद्यार्थ्याला त्याच्या पसंतीक्रमाणे प्रवेश मिळेल तसेच त्या नंतर उद्भवणारा सगळ्या बाबींची जबाबदारी संबंधित संस्था/विभाग (बार्टी, सारथी, महाज्योती, टीआरटीआय , अमृत व अल्पसंख्यांक विभाग, इत्यादी) यांची असेल. | आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था,पुणे तसेच संबंधित विभाग. |
| ४ | युपीएससी दिल्ली येथील प्रशिक्षणाकरीता उच्च व तंत्र विभागाने ऑक्टोबर, २०२३ रोजी निर्गमित केलेल्या शासन निर्णयाचा अवलंब करावा तसेच, सदर परीक्षा मराठी माध्यमातून द्यावयाची असल्यास या परीक्षेचे प्रशिक्षण राज्यातील प्रशिक्षणाकरीता अनुक्रमांक १ येथील गठित समितीने अनुक्रमांक २ व ३ मध्ये निश्चित केलेली प्रक्रिया राबवावी. | उच्च व तंत्र विभाग व आदिवासी विकास विभाग |

| | | |
|---|---|---|
| ५ | उमेदवारांना/विद्यार्थ्यांना देशांतर्गत तथा परदेशात अधिकाधिक नोकरीच्या संधी उपलब्ध होण्याच्या अनुषंगाने, GRE, TOEFL तसेच तत्सम इतर परीक्षांकरीता लागणारे प्रशिक्षण, युरोपियन भाषांचे प्रशिक्षण, इत्यादीसाठी त्या क्षेत्रातील नामांकित प्रशिक्षण संस्था नाम-निर्देशित (Empanel) करण्याची प्रक्रिया तसेच विद्यार्थी निवड प्रक्रिया देखील समितीने वर नमूद केलेल्या पद्धतीने करावी. | आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था,पुणे |
| ६ | इतर विभागांकडून यापूर्वी नाम-निर्देशित (Empanelment) करण्यात आलेल्या प्रशिक्षण संस्थांनी अ.क्र.१ येथील गठीत समितीकडून राबविण्यात येणाऱ्या नाम निर्देशनाच्या निवड प्रक्रियेत नव्याने भाग घेणे आवश्यक राहील. | अल्पसंख्यांक विभाग तसेच इतर संबंधित विभाग |
| ७ | आदिवासी विकास विभागाने सन २०२४-२५ करिता सादर केलेल्या विविध प्रशिक्षण कार्यक्रमाच्या आराखड्यास व लाभार्थी संख्येस (परिशिष्ट -१) मान्यता देण्यात आली. | आदिवासी विकास विभाग |
| ८ | ज्या विभागांनी त्यांचेमार्फत राबविण्यात येणाऱ्या कार्यक्रमांचे वार्षिक कृती आराखडे अद्याप अ.मु.स. (वित्त) यांच्या अध्यक्षतेखालील समितीसमोर मान्यतेस्तव सादर केलेले नाहीत त्यांनी तातडीने त्यांच्याकडील निधी उपलब्धतेच्या मर्यादेत सदर आराखडे तयार करून संबंधित नियामक मंडळाच्या मान्यतेने या समितीच्या मान्यतेस्तव सादर करावेत.<br>सदर वार्षिक कृती आराखड्यामध्ये राबविण्यात येणारे कार्यक्रम/प्रशिक्षण व लाभार्थी संख्या यांचा समावेश असावा व त्यानुसार लाभार्थी संख्या निश्चित करावी.<br>मान्य केलेल्या वार्षिक कृती आराखड्यात काही कारणास्तव बदल करावयाचे असल्यास अ.मु.स. (वित्त) यांच्या अध्यक्षतेखालील समितीसमोर मान्यतेस्तव सादर करावे. | संबंधित विभाग |
| ९ | महात्मा ज्योतीबा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्था (महाज्योती):-<br>१. सन २०२३ वर्षातील अर्ज करणाऱ्या व पात्र सर्व विद्यार्थ्यांना सरसकट व नोंदणी दिनांकापासून अधिछात्रवृत्ती मिळणे<br>२. महाज्योतीच्या पीएच.डी अधिछात्रवृत्ती योजनेतील लाभार्थी संख्येत वाढ करणे<br>३. सन २०२१,२०२२ व २०२३ या वर्षातील विद्यार्थ्यांना रजिस्ट्रेशन/नोंदणी दिनांकापासून अधिछात्रवृत्ती मिळणे.<br>४. यु.जी.सी. चे मार्गदर्शक सूचनांनुसार संशोधक विद्यार्थ्यांना देण्यात येणाऱ्या अधिछात्रवृत्ती रक्कमेत वाढ करणे. | सामाजिक न्याय विभागाच्या दि.३०.१०.२०२३ रोजीच्या शासन निर्णयानुसार संबंधित विभागाने कार्यवाही करावी. |
| १० | चालू वर्षातील अर्थसंकल्पीत व वितरीत निधी यापूर्वी मान्य करण्यात आलेल्या आराखड्यानुसार सर्व विभागांनी सत्वर खर्च करावा. | सर्व संबंधित विभाग |

(अ.को.आहिरे)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन